क्रमांक : १०१

महाराष्ट्र विधानपरिषद

पत्रक भाग दोन

गुरुवार, दिनांक २६ नोव्हेंबर, २०२६/ अग्रहायण ५, १९४८ शके

१०८. महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९७ अन्वये निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर "अल्पकालीन चर्चेच्या सूचना" स्वीकारण्याबाबत.

१. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२६ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनात महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चेची सूचना **MOIS या आज्ञावली (WEB PORTAL)** व्दारे **संपूर्णत: ऑनलाईन** पद्धतीने शुक्रवार, दिनांक ४ डिसेंबर, २०२६ रोजीपासून सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

२. महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चेची सूचना सादर करताना संबंधित बाबींवर चर्चा उपस्थित करण्यासंबंधीची कारणे नमूद करणारी स्पष्टीकरणात्मक टिप्पणी सादर करणे तसेच सूचनेच्या पुष्ट्यर्थ किमान इतर दोन सदस्यांचा ऑनलाईन पाठिंबा घेणे आवश्यक आहे.

३. महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९७ अन्वये द्यावयाच्या सूचनेचा विषय हा निकडीचा, सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, मुद्देसूद असणे आवश्यक आहे.

४. महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९७ अन्वये प्राप्त होणाऱ्या सूचना स्वीकृती संबंधी व स्वीकृत सूचना चर्चेला घेण्यासंबंधीचा संपूर्ण अधिकार मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचाच राहिल.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : २६ नोव्हेंबर, २०२६

डॉ.विलास आठवले
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद

प्रती :-

(१) महाराष्ट्र विधानरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य
(२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव
(३) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे कार्यालय
(४) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
(५) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
(६) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
(७) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
(८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी
(९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालय
(१०) संगणक कक्ष **(WEBSITE)**
(११) एम.के.सी.एल. **(MKCL)**